**शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि राज्यशास्त्र विभाग कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर, जिल्हा. सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने**

**बी. ए. भाग दोन राज्यशास्त्र**

# "भारतीय राजकीय विचारवंत सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळा"

**सोमवार, दि. 15 सप्टेंबर, 2025**

## कार्यशाळा अहवाल

**उद्घाटन समारंभ :**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बी. ए. भाग दोन या वर्गाच्या भारतीय राजकीय विचारवंत भाग एक आणि दोन (पेपर नं. IV & VI) या विषयाची सुधारित अभ्यासक्रमाची कार्यशाळा आज आपल्या कॉलेजमध्ये आयोजित केली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. ॲड. एन. आर. पाटील (अध्यक्ष, महात्मा फुले शिक्षण संस्था) उपस्थित होते. तर अध्यक्ष म्हणून मा. प्राचार्य डॉ. नितीन शिंदे उपस्थित होते. तसेच शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख आणि राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. प्रा. डॉ. रवींद्र भणगे, कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड आणि उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी राज्यशास्त्र विषयाचे ८० प्राध्यापक सहभागी झाले होते.

उद्घाटन समारंभाचे स्वागत व प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. के. खडसे यांनी केले. या ही कार्यशाळा कोणत्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आली आहे हे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. ॲड. एन. आर. पाटील म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार विविध विषयाचे अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडून तयार केले जात आहेत. या बदललेल्या अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने विविध ठिकाणी कार्यशाळा मंजूर करून तेथे प्राध्यापकांना प्रशिक्षण देण्याचे कार्य विद्यापीठ करीत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नवीन आव्हानाला सामोर जाण्यासाठी विद्यापीठ विद्यार्थ्यांसाठी कौशल्यावर आधारित विषय आणत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून आपल्या बदललेल्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण पूर्ण दिवसभर घ्यावे ह्या दोन्ही कार्यशाळेच्या प्रशिक्षणासाठी तज्ञ

मार्गदर्शक आलेले आहेत. ते आपल्याला विद्यार्थ्यांना कशा पद्धतीने या विषयाचे अध्यापन करावे तसेच आपल्याला कोणती अडचण येणार नाही यासाठी हे प्रशिक्षण उपयोगी होणार आहे.




उद्घाटन सत्राचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण व्यवस्थेमध्ये झालेल्या बदलाचा आढावा घेत कोणती आव्हाने आपल्यासमोर उभी आहेत व त्यांना आपण कसे सामोरे गेले पाहिजे याविषयी मार्गदर्शन केले.




या सत्राचे आभार वाणिज्य शाखेचे विभागप्रमुख प्रा. डॉ. चंद्रकांत भारसाकळे यांनी व्यक्त केले तर सूत्रसंचालन सौ. पूजा कुपाडे यांनी केले.

**बीजभाषण सत्र :-**

शिवाजी विद्यापीठाचे विभागप्रमुख आणि राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. रवींद्र भणगे बीजभाषण देताना म्हणाले की, शिवाजी विद्यापीठाच्या सांगली, सातारा आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्याच्या मध्यवर्ती आपले कॉलेज असल्यामुळे राज्यशास्त्र अभ्यास मंडळाने आपल्या कर्मवीर

भाऊराव पाटील कॉलेजला बी.ए.भाग दोन. राज्यशास्त्र विषयाच्या बदलेल्या अभ्यासक्रमाची कार्यशाळा मंजूर केलेली आहे आणि मला आनंद वाटतो की या तिन्ही जिल्ह्यातून सर्व प्राध्यापक आलेले आहेत.

पुढे ते म्हणाले की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार शिक्षकाने विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख बनवावे आणि विद्यार्थ्यांमध्ये विविध स्वरूपाची कौशल्य विकसित करावी तसेच विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी कोणत्या आहेत याची माहिती करून द्यावी म्हणजे आपला विद्यार्थी जगाच्या स्पर्धेमध्ये टिकेल यासाठी आपण राज्यशास्त्र विषयाचा अभ्यासक्रम तयार करण्याचे कार्य केलेले आहे. त्यामुळेच सर्व शिक्षकांना बदललेल्या अभ्यासक्रमासंबंधी प्रशिक्षणाची व्यवस्था या कार्यशाळेच्या माध्यमातून केलेली आहे

त्यामुळे आपण सर्वांनी या सुधारित अभ्यासक्रमाच्या कार्यशाळेत प्रशिक्षण घेऊन विद्यार्थ्यांना चांगल्या पद्धतीने अध्यापन करावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. या कार्यशाळेसाठी जे तज्ञ मार्गदर्शक आहेत त्यांचे मी स्वागत करतो आणि आपल्या सर्वांना दिवसभरासाठी शुभेच्छा देतो.



शिवाजी विद्यापीठाचे विभागप्रमुख आणि राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. रवींद्र भणगे बीजभाषण करताना सोबत

बीजभाषण **सत्राच्या अध्यक्षा प्रा. डॉ. मेघा पाटील** यांनी बजभाषणाचा आढावा घेतला आणि ही कार्यशाळा या कॉलेज ने आयोजित करून आमच्या राज्यशास्त्राच्या प्राध्यापकाना सुधारित अभ्यासक्रम  कार्यशाळेत सहभागी होण्याची संधी दिली त्याबद्दल मी के. बी. पी. कॉलेज चे आभार मानते.

**सत्र पहिले:-**

पहिला सत्रामध्ये **प्राचार्य डॉ. श्रद्धा कोठावळे** यांनी **भारतीय राजकीय विचारवंत** या पेपरमधील **प्रकरण एक- 'कौटिल्य'** आणि **प्रकरण दोन – 'राजाराम मोहन राय'** या दोन विचारवंतावर अतिशय अभ्यासपूर्ण अशी मांडणी केली. कौटिल्य त्यांचे राज्याविषयी विचार, सप्तांग सिद्धांत, न्याय संकल्पना आणि मंडल सिद्धांत याविषयी सविस्तर मांडणी केली. तसेच राजा राम मोहन राय या प्रकरणातील विविध मुद्द्यावर सविस्तर चर्चा केली त्यानंतर प्रश्न उत्तर या चर्चेसत्रात अनेक शिक्षकाने प्रश्न विचारले त्या सर्व प्रश्नांची उत्तरे अतिशय अभ्यासपूर्ण अशी देण्याचे काम त्यांनी केलेले आहे.



या सत्राचे अध्यक्ष म्हणून **प्रा. डॉ. शशिकांत संघराज** हे उपस्थित होते. त्यांनीही या दोन्ही प्रकरणामध्ये कोणते मुद्दे महत्वाचे आहेत? आपण विद्यार्थ्यांना हे विचारवंत का आणि कशासाठी शिकवावयाचे? याविषयी मांडणी केली.

**सत्र दुसरे :-**

या दुसऱ्या सत्रामध्ये प्रमुख साधन व्यक्ती म्हणून **प्रा.डॉ.टी.एम.पाटील** उपस्थित होते. त्यांनी **'भारतीय राजकीय विचारवंत'** या पेपरमधील **प्रकरण तीन 'महात्मा ज्योतिबा फुले'** आणि **प्रकरण चार 'लोकमान्य टिळक'** या दोन प्रकरणावर सविस्तर चर्चा केली. महात्मा फुले या प्रकरणामधील ब्राह्मण्यवाद याचे चिकित्सक विश्लेषण केले तसेच बळीराजा संकल्पना आणि सत्यशोधक समाज या तिन्ही मुद्द्यावर त्यांनी सविस्तर मान्य केले.

त्यानंतर **प्रकरण चार** लोकमान्य टिळक यांची स्वराज्य संकल्पना, सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि प्रतिकार या मुद्द्यावर प्राचार्य डॉ.टी.एम.पाटील यांनी सविस्तर मांडणी केली. अनेक शिक्षकांनी प्रश्न विचारले त्यावर त्यांनी अभ्यासपूर्ण अशी उत्तरे देऊन सदर सत्र संपले.




या सत्राचे अध्यक्ष म्हणून डॉ.विजय देठे उपस्थित होते.  यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांची प्रस्तुतता काय आहे आणि लोकमान्य टिळक यांचे राजकीय विचार आज कशा पद्धतीने प्रस्तुत आहेत  याविषयी चर्चा करण्याचे कार्य त्यांनी केले.

**सत्र तिसरे:-**

या दुसऱ्या सत्राचे साधन व्यक्ती म्हणून **प्रा.डॉ.शार्दुल सेलूकर** हे होते. त्यांनी भारतीय राजकीय विचारवंत या पेपरमधील **प्रकरण पाच 'महात्मा गांधी'** यांच्या सत्य आणि अहिंसा, स्वराज्य, विश्वस्त संकल्पना आणि सर्वोदय  या मुद्द्यावर अतिशय अभ्यासपूर्ण अशी मांडणी केली.

**प्रकरण 6** मधील **'एम. एन. रॉय'** यांचे लोकशाही संकल्पना, मार्क्सवादी विचार आणि नव मानवतावाद किंवा नव मानवतावाद या मुद्द्यावर त्यांनी अभ्यासपूर्ण अशी मांडणी केली.




या सत्राचे अध्यक्ष म्हणून **प्रा. डॉ. अधिकराव निकम** हे उपस्थित होते. त्यांनीही महात्मा गांधी आणि एम. एन. रॉय यांच्या विचाराचे चिकित्सक मूल्यमापन केले.

**चौथे सत्रः-**

या सत्रामध्ये शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. सुखदेव उंदरे यांनी भारतीय राजकीय विचारवंत मधील **प्रकरण सात- 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर'** आणि **प्रकरण आठ- 'पंडित जवाहरलाल नेहरू'** या विषयावर मांडणी केली.

प्रकरण सात मध्ये **'डॉ. बाबासाहेब आंबेडकर'** यांचे जातीविषयक विचार, संसदीय लोकशाही विषयक विचार आणि राज्य समाजवाद या विचारावर अभ्यासपूर्ण अशी मांडणी केली, यामध्ये त्यांनी भारतामध्ये जातीचा उगम कसा झाला याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीचे विश्लेषण जे केले तीच मांडणी करण्याचे काम त्यांनी केले तसेच त्यांनी राज्य समाजवाद यामध्ये मांडणी करताना म्हणाले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा राज्य समाजवाद भारतामध्ये रुजला असता किंवा भारताने त्याची अंमलबजावणी केली असती तर कदाचित भारतामध्ये गरिबी राहिली नसती. सर्व संपत्ती आणि शेतीचं समान वाटप झाला असतं. त्यामुळे बेरोजगारी आणि गरिबीचा प्रश्न भारतातला संपला असता. परंतु राज्य समाजवादाचे विचार आजही भारतामध्ये रुजले नाही किंबहुना या विरोधात भारतामध्ये राज्य समाजवाद अमलात न येता राज्य भांडवलवाद आज येऊ पाहत आहे तसेच संसदीय लोकशाही याविषयी बोलताना ते म्हणाले की अध्यक्षीय लोकशाहीपेक्षा संसदीय लोकशाही भारतासारख्या विविध स्वरूपाची विषमता असलेल्या देशांमध्ये असणे आवश्यक आहे.

नंतर **प्रकरण आठ** मधील **'पंडित जवाहरलाल नेहरू'** यांचे संसदीय लोकशाही, पंचशील तत्वे, धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद आणि मिश्र अर्थव्यवस्था इत्यादी पंडित नेहरू यांच्या विचारावर मांडणी करण्याचे कार्य त्यांनी केले आणि पुढे असे म्हणाले संपूर्ण भारताची उभारणी पंडित नेहरू यांच्या विचारावर झालेली आहे.




या सत्राचे अध्यक्ष म्हणूनडॉ.उदय लाड होते त्यांनी भारत विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे.परंतु आज पंडित नेहरूचे विचार मागे पडत आहेत. त्यामुळे भारताचे अर्थव्यवस्था आज धोक्यात आलेली असून मिश्र अर्थव्यवस्था आज राहिलेली दिसून येत नाही. भारत भांडवलशाही अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करीत आहे. त्यामुळे भविष्यामध्ये आर्थिक विषमता प्रचंड निर्माण होणार आहे.

**कार्यशाळा समारोप समारंभ:-**

कार्यशाळा समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे त्यामुळे आपण सर्वांनी या सुधारित अभ्यासक्रमाच्या कार्यशाळेत प्रशिक्षण घेऊन विद्यार्थ्यांना चांगल्या पद्धतीने अध्यापन करावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. या कार्यशाळेसाठी जे तज्ञ मार्गदर्शक आणि सहभागी प्राध्यापक, या कॉलेजचे प्राचार्य आणि  राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक  उपस्थित आहेत. आपल्या सर्वाचे शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आभार मानतो .




कार्यशाळा समारोप समारंभाचे अध्यक्ष प्रा.संतोष नांगरे आणि डॉ.टी.एम.पाटील डॉ. सुखदेव उंदरे इत्यादी उपस्थित होते ,

कार्यशाळेचे आभार प्रा.डॉ.अंगद पाटील यांनी मानले तर कार्यशाळेचे सूत्रसंचालन कु. मानसी पाटील याने केले

कार्यशाळा समन्वयक

